


# दैनिक आकर्षण


संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे






वर्ष ५ ▌अंक १६६ ▌बुधवार १८ मार्च २०२६ ▌पाने ४ ▌मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@ gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


## भिंगारमध्ये महात्मा जोतिबा फुले व डॉ. आंबेडकर जयंती मिरवणुकीवर डीजे बंदी

### मंडळांचे प्रशासनाकडे निवेदन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भिंगार व नागरदेवळे परिसरात दरवर्षीप्रमाणे विविध सामाजिक उपक्रमांसह भव्य मिरवणुकीचे आयोजन केले जाते. मात्र यंदा भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनने मिरवणुकीत डीजे वापरण्यास परवानगी नाकारण्याची भूमिका घेतल्याने स्थानिक मंडळांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दि. १६ मार्च २०२६ रोजी भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन येथे झालेल्या बैठकीत वापरास परवानगी देण्यात येणार नसल्याचे सांगण्यात आले. त्यापूर्वी दि.१६ मार्च रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) दिलीप टिपरसे यांची भेट घेऊन मंडळांच्या प्रतिनिधींनी आपली भूमिका मांडली होती.

नागरदेवळे व भिंगार परिसरातील ८ ते १० मंडळे दरवर्षी महात्मा जोतिबा फुले जयंती मिरवणुकीत सहभागी होत असून,रक्तदान शिबिरे, व्याख्याने,तसेच गरजू विद्यार्थ्यांना वही-पुस्तकांचे वाटप अशा विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. सायंकाळी पारंपरिक पद्धतीने मिरवणूक काढण्याची अनेक वर्षांची परंपरा आहे. दरम्यान,अनेक मंडळांनी साउंड सिस्टीमसाठी आगाऊ रक्कम दिलेली असल्याने बंदीमुळे आर्थिक नुकसान सहन करावे लागणार

■ पान ४ वर

## पांढरीपुल, इमामपूर घाटात मंगळसूत्र चोरांचा धुमाकूळ

### छावा संघटनेचा १९ मार्च रोजी रास्ता रोकोचा इशारा । महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर; आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी। लुटमारीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**सुट्टीची सूचना**

गुढीपाडव्यानिमित्त गुरुवार दि. १९ मार्च २०२६ रोजी दैनिक 'आकर्षण' कार्यालयास सुट्टी असल्याने दि. १९ मार्च २०२६ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही, याची वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी नोंद घ्यावी.

– संपादक

गुढीपाडव्यानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पांढरीपुल व इमामपूर घाट परिसरात वाढलेल्या मंगळसूत्र चोरी व लुटमार प्रकरणांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, या घटनांवर आळा घालण्यासाठी सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने आरोपींना अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे पाटील यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिले. या मागण्यांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास १९ मार्च रोजी पांढरीपुल येथे ग्रामस्थांसह रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, इमामपूर घाटाच्या हद्दीत गेल्या काही दिवसांत मंगळसूत्र चोरी व लुटमारीच्या अनेक घटना घडल्या आहेत. शहरासह ग्रामीण भागातही चोरीचे प्रमाण वाढले असून, विशेषतः महिलांना लक्ष्य करून गुन्हेगारांकडून हल्ले केले जात आहेत. सोन्याचे दर गगनाला भिडल्याने चोरट्यांनी मंगळसूत्र चोरीकडे मोठ्या प्रमाणात वळल्याचे दिसून येत आहे.

यामुळे महिलांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक महिला घराबाहेर पडताना भीतीच्या छायेत वावरत असल्याचे चित्र आहे. काही नागरिक पोलिसांच्या प्रक्रियेच्या भीतीने तक्रार दाखल करण्यास टाळाटाळ करत असल्याने गुन्हेगारांचे मनोबल अधिक वाढत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

■ पान ४ वर


**CHANGEING IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME KATHED VANDANA SANJAYKUMAR TO NEW NAME VANDANA SANJAY KATHED Addhar No. 817868781210


## ३ हॉटेल्सवर धाड; ५ गॅस सिलिंडर जप्त

### पुरवठा विभागाची कारवाई : व्यावसायिकांना इशारा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील विविध हॉटेल्समध्ये घरगुती गॅसचा अवैध वापर होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर तहसीलच्या पुरवठा विभागाने धडक कारवाई करत ३ हॉटेल्सवर छापे टाकले. या कारवाईत एकूण ५ गॅस सिलिंडर जप्त करण्यात आले.

जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी व तहसीलदार ज्योती पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका पुरवठा अधिकारी कैलास बडूरे यांनी ही कारवाई केली. पैठण-बिडकीन मार्गावरील 'हॉटेल शिंदेमामा' येथे ३ घरगुती सिलिंडर आढळून आले. धरणगाव फाट्यावरील 'ओम साई एक्झिक्युटिव्ह' येथे १ सिलिंडर, तर बिडकीन येथील 'हॉटेल संदीप

■ पान ४ वर









## दै. आकर्षण निवडक

### ब्लु डायमंड स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा



अहिल्यानगर - ब्ल्यू डायमंड अकॅडमीमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला .प्रमुख पाहुण्या बालरोगतज्ञ डॉ.पल्लवी तोडमल उपस्थित होत्या. उपप्राचार्या शारदा शेळके यांनी प्रास्ताविकात महिला दिनाचे औचित्य साधून विद्यार्थिनी व महिलासाठी डॉक्टरांचे व्याख्यान आयोजित केल्याचे सांगितले व स्कूलमधून नेहमीच विद्यार्थ्यांच्या हिताचे उपक्रम राबवण्याचे आश्वासन दिले. डॉ. पल्लवी तोडमल यांनी उपस्थित महिला पालक व विद्यार्थिनींना आरोग्य, आहारविषयक मार्गदर्शन केले. आजच्या काळात स्त्री सर्व क्षेत्रात पुढे आहे सर्व जबाबदाऱ्या स्वीकारते. परंतु हे करत असताना स्वतःच्या आरोग्यासाठी व्यायाम व योगासने यांचे महत्त्व त्यांनी सांगितले. मोबाईल व टीव्ही स्क्रीन समोर जास्त वेळ दिल्याने होणारे दुष्परिणाम सांगून ते टाळण्यास सांगितले. विद्यार्थिनी व महिला पालकांच्या शंकांचे निरसन केले .पाहुण्यांचा परिचय शुभांगी पाटोळे मॅडम यांनी करून दिला. सूत्रसंचालन इ. आठवीच्या विद्यार्थिनी बुशरा शाहीद शेख व भक्ती किशोर भणगे यांनी केले. इ. ७ वी च्या विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले. रेणुका दाभाडे यांनी आभार मानले.

### पारनेर मधील भोंदू बाबाच्या गुन्ह्यांचा पर्दाफाश




अहिल्यानगर- पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथे संस्था चालवणाऱ्या भोंदू बाबाच्या गंभीर गुन्ह्यांचा तपास सखोल करण्यासाठी त्याची नार्को टेस्ट करण्यात यावी, अशी मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांना दिले असून, आठ दिवसांत ठोस कारवाई न झाल्यास २० मार्चपासून पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर ग्रामस्थांसह बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. समितीने दिलेल्या निवेदनानुसार, पारनेर पोलीस स्टेशनमध्ये दुर्गादेवी वारकरी शिक्षण संस्था, ढवळपुरी (ता. पारनेर) चालवणारा यशवंत एकनाथ थोरात उर्फ अण्णासाहेब गुंजाळ (महाराज) या भोंदू बाबाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याला अटक करण्यात आली आहे. संबंधित आरोपीने पिडीत कुटुंबाशी विश्वासाचे संबंध निर्माण करून त्यांच्या मुलीवर दीर्घकाळ अत्याचार केल्याचा गंभीर आरोप आहे. विशेष म्हणजे, आरोपीने आपले खरे नाव लपवून दुसऱ्या नावाने सन २०२१ पासून ढवळपुरी परिसरात वास्तव्य केल्याची माहिती समोर आली आहे. शिक्षण संस्थेच्या माध्यमातून अनेक कुटुंबांशी संबंध प्रस्थापित करून त्याने विश्वास संपादन केला. फिर्यादी युवकही त्या संस्थेत सचिव म्हणून कार्यरत असल्याने आरोपीशी त्याचे घरगुती संबंध निर्माण झाले होते. या विश्वासाचा गैरफायदा घेत आरोपीने फिर्यादीच्या बहिणीवर अत्याचार केल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच, आरोपीचे अनेक विवाह झाल्याच्या चर्चा असून, त्याच्या आमिषाला काही महिलाही बळी पडल्याचे सांगण्यात आले आहे. पिडितेला ''मी दोन हाफ मर्डर केले आहेत'' अशी धमकी देत अत्याचार केल्याचा धक्कादायक आरोपही समोर आला आहे. त्यामुळे आरोपीने यापूर्वीही अनेक गंभीर गुन्हे केले असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# महिला दिनानिमित्त नैसर्गिक आरोग्याचा जागर; नॅचरोपॅथी व योगाद्वारे रोगमुक्तीचा संदेश

## महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद । सांधेदुखी, शरीर शुद्धी ते नैसर्गिक सौंदर्यतज्ज्ञांचे प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आरोग्यवर्धिनी योग निसर्गोपचार संस्थेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेले 'नैसर्गिक सौंदर्य व निरोगी जीवन' या विषयावरील विशेष मार्गदर्शन शिबिर उत्साहात संपन्न पार पडले. शहरातील दूधगंगा पशुखाद्य केंद्र, शिवाजी महाराज पुतळ्यासमोर, मार्केटयार्ड येथे पार पडलेल्या या कार्यक्रमास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

प्रास्ताविकात हेमा सेलोत यांनी नैसर्गिक सौंदर्य व निरोगी जीवनासाठी योग व निसर्गोपचाराचे महत्त्व सांगितले. या कार्यक्रमात गुडघे व सांधे विकार, नॅचरोपॅथी व शरीरशुद्धी तसेच नैसर्गिक सौंदर्य प्रसाधनांची माहिती अशा विविध विषयांवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात पुण्याचे सुप्रसिद्ध तज्ज्ञ डॉ. विश्वजीत चव्हाण यांनी गुडघे व सांधे विकारांवर सविस्तर मार्गदर्शन केले. सूक्ष्म व्यायाम, योगिक व्यायाम आणि योग्य आहार पद्धतीच्या माध्यमातून सांधेदुखी



व गुडघेदुखीपासून मुक्ती कशी मिळवता येते, याचे त्यांनी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. सहज योग ध्यानाची अनुभूती दिली. यावेळी कोमल उंडे यांनी प्रात्यक्षिके सादर केली.

दुसऱ्या सत्रात अध्यक्षा डॉ. हेमांगिनी पोतनीस यांनी पुण्याचे आलेले डॉ. आशा काळे, डॉ. आशा राव. डॉ. रेवती जावरेकर यांचा सत्कार करुन त्यांचा परिचय करून दिला. यावेळी प्रयास ग्रुपच्या संस्थापक अध्यक्षा अलका मुंदडा यांच्यासह अनेक मान्यवर महिला उपस्थित होत्या.

तिसऱ्या सत्रात नैसर्गिक सौंदर्य प्रसाधनांवरील प्रात्यक्षिक कार्यशाळा घेण्यात आली. घरच्या घरी उपलब्ध असलेल्या नैसर्गिक घटकांपासून मेकअप साहित्य, लिपस्टिक, फेस पॅक व लिपबाम कसे तयार करावे याचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन ऐश्वर्या शहा (देवी) आणि साक्षी मेहतांनी यांनी केले. या कार्यशाळेला महिलांनी मोठ्या उत्साहाने प्रतिसाद देत प्रत्यक्ष सहभाग नोंदविला. चेतना सोळंकी यांनी अग्निहोत्राचे महत्व सांगून तो प्रज्वलित केला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित महिला व विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले तसेच सर्वांसाठी नॅचरोपॅथी सरबत आणि अल्पोपहार राखी गांधी व सपना गुगळे यांनी उपलब्ध करुन दिला.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी आधार आपुलकी अकॅडमी फाउंडेशन, बॉलर्स अकॅडमी तसेच योगतज्ज्ञ अनिल मेहर, मनोज राजापुरे, गणेश तनपुरे, मयूर कांगणे, डॉ. शैलेजा घुले, ज्योती कानडे, , शुक्ला मुथा, दीप्ती गांधी, , राखी गांधी, जयश्री तनपुरे, भारती दौलतनी, ऋतुजा गिते, सपना गुगळे, दीपिका भारदे आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी सभागृह उपलब्ध करून दिल्याबद्दल सरदार गांधी यांचे आभार मानण्यात आले.

## कॉ. बापूसाहेब भापकर राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत मुंबई विद्यापीठ प्रथम



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कॉ. बापूसाहेब भापकर यांचे सामाजिक योगदान अतुलनीय असून अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या रोपट्यापासून वटवृक्षात रूपांतर करण्यामध्ये त्यांचा मोठा वाटा आहे. नवयुवकांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन सामाजिक जबाबदारी पार पाडली, तर राज्य व राष्ट्राचे कल्याण होईल. तसेच युवकांनी व्यसनांपासून दूर राहून स्वनिर्मितीत भर द्यावी, असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांनी केले.

येथील न्यू लॉ कॉलेजतर्फे आयोजित १९ वी कॉ. बापूसाहेब भापकर राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे, प्रा. डॉ. रामेश्वर दुसुंगे व प्रा. विजयकुमार शिंदे उपस्थित होते.

यावेळी डॉ. विवेक भापकर म्हणाले की, न्यू लॉ कॉलेज गेल्या एकोणीस वर्षांपासून सातत्याने ही राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करत असून कॉ. बापूसाहेब भापकर यांचे विचार संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचविण्याचे कार्य करत आहे. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्कृष्ट वक्तृत्व कौशल्य विकसित होऊन भविष्यातील विचारवंत व सक्षम वकील घडत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे यांनी स्वागत व प्रास्ताविक करताना महाविद्यालयाच्या विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. स्पर्धकांनी तसेच परीक्षक प्रा. डॉ. मच्छिंद्र मालुंजकर व प्रा. ए. एस. सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले. अतिथी परिचय प्रा. ए. ए. म्हस्के यांनी केला. सूत्रसंचालन प्रा. प्रियंका खुळे-कांडेकर यांनी केले तर आभार प्रा. डॉ. रामेश्वर दुसुंगे यांनी मानले.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयांतील २५ संघांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. अनुराधा मते, प्रा. अतुल म्हस्के, डी. बी. मोरे, ग्रंथपाल सौरभ साबळे, प्रा. आर. डी. भवाळ, अधीक्षक हेमा कदम तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

स्पर्धेचा निकाल :

प्रथम पारितोषिक विवेक भापकर (विश्वस्त) यांच्या तर्फे कॉ. बापूसाहेब भापकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ देण्यात आले. यामध्ये यश रवींद्र पाटील व अभय कृष्णाकांत आळशी (मुंबई विद्यापीठ, मुंबई) यांनी प्रथम क्रमांक पटकावत रोख ७००१ व करंडक मिळविला.

द्वितीय पारितोषिक रामचंद्रजी दरे (विश्वस्त, अ.जि.म.वि.प्र. समाज) यांच्या तर्फे कै. हरिभाऊ दरे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ देण्यात आले. संपदा मच्छिंद्र लांडगे व हुमेरा अन्सारी (न्यू लॉ कॉलेज, अहिल्यानगर) यांनी द्वितीय क्रमांक पटकावत रोख ५००१ व करंडक मिळविला.

तृतीय पारितोषिक डॉ. एम. एम. तांबे यांच्या तर्फे कै. मल्हारी तांबे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ देण्यात आले. अनिकेत रामा आणारे व रोहन ज्योतिराव कवडे (कला व वाणिज्य महाविद्यालय, पुणे) यांनी तृतीय क्रमांक पटकावत रोख ४००१ व करंडक मिळविला.

चतुर्थ पारितोषिक डॉ. आर. बी. दुसुंगे यांच्या तर्फे कै. मनीषा दुसुंगे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ देण्यात आले. उत्कृष्ट वक्ता म्हणून पूजा अनिल कोरडे (न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगाव) व कार्तिकी रामहरी पवार (रेसिडेन्शियल ज्युनियर कॉलेज, अहमदनगर) यांना विभागून रोख १५०१ व चषक देण्यात आले. उत्तेजनार्थ पारितोषिक कॉ. एकनाथराव भागवत यांच्या स्मृतिप्रित्यर्थ कॉ. भाऊसाहेब थोटे यांच्या तर्फे देण्यात आले. अमोल रामचंद्र गोळे (सौ. निर्मलाताई थोपटे कॉलेज, भोर पुणे) यांना रोख १००१ देऊन गौरविण्यात आले.

## माणिकदौंडी परिसराला जायकवाडी नळ पाणीपुरवठा योजना मंजूर करा

### मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांची पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पाथर्डी–** तालुक्यातील माणिकदौंडी हा दुष्काळी व दुर्गम भाग असून या भागातील गावे ही नेहमीच दुष्काळाच्या झळा सहन करत असून पटेलवाडा तलाव सोडता कुठेही बारा महीने पुरेल एवढा शाश्वत पाण्याचा स्त्रोत नसल्याने माणिकदौंडी परिसरातील गावांना जायकवाडी धरणातून नळ पाणीपुरवठा योजना मंजूर करावी अशी मागणी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी केली.

माणिकदौंडी परिसर हा डोंगराळ व दुर्गम असल्याने या भागातील जनतेला पाण्यासाठी नेहमीच वणवण व पायपीट करावी लागते ही वस्तुस्थिती आहे यासाठीच आपण ही मागणी



केली असून पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी याविषयी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित अधिकाऱ्यांना याविषयी सूचना केल्या असून या पाणीपुरवठा योजनेचा आपण सतत पाठपुरावा करणार असल्याचे अविनाश पालवे यांनी सांगितले.

## अहिल्यानगर जिल्हा मराठा पतसंस्थेच्या वतीने शहाजीराजे भोसले यांच्या जयंती निमित्त अभिवादन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा मराठा पतसंस्थेच्या वतीने हिंदवी स्वराज्याचे प्रेरणास्थान शहाजीराजे भोसले यांच्या जयंतीनिमित्त ऐतिहासिक वस्तू संग्रहालय येथे त्यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन उदय अनभुले, पत्रकार डॉ. सूर्यकांत वरकड, संचालक द्वारकाधीश राजे भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक वारकड, व्यवस्थापक बबनराव सुपेकर, वस्तुसंग्रहालयाचे उपव्यवस्थापक आनंद कल्याण, मनीष रोहकले, प्रकाश घोडके, राहुल भोर, संतोष दांगडे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात शहाजीराजे भोसले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत इतिहासातील त्यांच्या योगदानाची आठवण जागवली.

यावेळी बोलताना व्हाईस चेअरमन उदय अनभुले म्हणाले की, शहाजीराजे भोसले हे एक दूरदृष्टीचे, पराक्रमी आणि स्वराज्याच्या संकल्पनेचे मूळ प्रेरणास्थान होते. त्यांनी दिलेल्या संस्कारांमुळेच छत्रपती शिवाजी महाराजांसारखा महान राजा घडला. आजच्या पिढीने त्यांच्या जीवनकार्याचा अभ्यास करून त्यातून राष्ट्रप्रेम, कर्तव्यनिष्ठा आणि स्वाभिमानाची शिकवण घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

## भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अल्पवयीन विद्यार्थ्यांना मारहाण?

### पालकांची बालकल्याण समितीकडे धाव; वैद्यकीय तपासणीची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात इयत्ता दहावीतील काही अल्पवयीन विद्यार्थ्यांना अमानुष मारहाण केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून संबंधित पोलीस अधिकारी, होमगार्ड व शिक्षकांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी पालकांनी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित विद्यार्थी दहावीची परीक्षा देण्यासाठी सकाळी जात असताना ट्रिपल सीटने प्रवास करत होते. यावेळी परिसरात राहणाऱ्या एका होमगार्डसोबत जुना वाद असल्याने त्यातून वाद निर्माण झाला. विद्यार्थ्यांनी सांगितल्याप्रमाणे, होमगार्डने रागातून विद्यार्थ्यांना अडवून मारहाण केली. त्यानंतर दोन्ही बाजूंमध्ये हाणामारी झाली असून हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्हीत कैद झाल्याचे समोर आले आहे. मात्र सुरुवातीचे फुटेज देण्यास टाळाटाळ होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यानंतर विद्यार्थ्यांना भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात आणण्यात आले. पालकांचा आरोप आहे की, पोलीस ठाण्यात असताना पोलीस कर्मचारी व होमगार्ड यांनी मुलांना अमानुषपणे मारहाण केली. दुपारी सुमारे २.३० वाजता विद्यार्थ्यांनी पालकांना फोन करून माहिती दिल्यानंतर पालक तत्काळ पोलीस ठाण्यात पोहोचले.

मारहाणीमुळे मुलांची प्रकृती बिघडली असून त्यांना हातात पेनही धरता येत नसल्याचा आरोप पालकांनी केला आहे. त्यामुळे वैद्यकीय तपासणीची मागणी करण्यात आली. तसेच पोलिसांनी मुलांना त्वरित वैद्यकीय तपासणीसाठी न पाठवता व पालकांच्या ताब्यात देण्यास विलंब केल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम झाला असून पुढील पेपरबाबतही पालकांनी चिंता व्यक्त केली आहे.

## आनंदऋषीजी हॉस्पिटल आरोग्याचे मंदिर - सुवालालजी बोथरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ज्याप्रमाणे माणूस मंदिरात गेल्यानंतर आपले सर्व दु:ख विसरतो त्याप्रमाणेच या आरोग्य मंदिरात रूग्णांना त्याचा प्रत्यय येत आहे. हॉस्पिटलमध्ये मिळणार्या सोयी-सुविधा व मानसिक आधारामुळे रूग्णांचा आजार लवकर बरा होतो, त्यामुळे आज आनंदऋषीजी हॉस्पिटल आरोग्याचे मंदिर झाले आहे. सातत्याने रुग्णांचा मोठा विश्वास या हॉस्पिटलवर वाढत आहे. दुसर्याला मदत करण्याची इच्छा असणे व मदत करणे यात फरक आहे आणि मदत करण्याचे काम आनंदऋषीजी हॉस्पिटल करत आहे. असे प्रतिपादन सुवालालजी बोथरा यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन द्वारा संचलित श्री आनंद ऋषीजी हॉस्पिटल अँड हार्ड सर्जरी सेंटरमध्ये राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या ३४ व्या पुण्यस्मरणानिमित्ताने स्व. सौ. शकुंतला सुवालालजी बोथरा यांच्या स्मरणार्थ बोथरा परिवाराच्या वतीने मेंदुविकार तपासणी व उपचार शिबाराचे उदघाटन सुवालालजी बोथरा यांच्या हस्ते करण्यात आले. विनोद बोथरा, प्रमोद बोथरा ,प्रकाश बोथरा ,सुबोध बोथरा,सौ कविता बोथरा, सौ संगीता बोथरा,सौ कल्पना बोथरा,सौ राखी बोथरा सौ रविना बोथरा सौ सेजल बोथरा, सौ सोजल बोथरा सौ महिमा बोथरा,सौ साक्षी



बोथरा,आशुतोष बोथरा, मोहक बोथरा, वृषभ बोथरा,श्रेयस बोथरा,निखिल बोथरा,सुधांशु बोथरा,प्रग्यान बोथरा,ऋषीका बोथरा,रिध्दी बोथरा,माही बोथरा,आर्याना बोथरा,हितांशी बोथरा,पियांशी बोथरा,रोहांश बोथरा, डॉ प्रकाश कांकरीया,माणकचंद कटारीया, सुभाष मुनोत, डॉ.वसंत कटारिया , व डॉक्टर आशिष भंडारी वसंत चोपडा, प्रकाश छल्लाणी,न्यूरोलॉजिस्ट डॉ. अद्वोत गिते , डॉ. वैशाली कदम, मेंदू विकार तज्ञ डॉ. स्नेहा म्हस्के आदी मान्यवर उपस्थित होते.

रविना बोथरा म्हणाल्या, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये रुग्णांना मिळत असलेल्या सेवेत विश्वासार्हता आहे. त्यामुळे हे हॉस्पिटल गरीब - गरजु रुग्णांकरीता मोफत शिबीरे घेतात त्यामुळे रुग्णांकरीता हे एक वरदान ठरत आहे. ही समाजाच्या दृष्टीने एक चांगली बाब आहे. समाजातील दु:ख निवारण्याचे काम जैन सोशल फेडरेशनच्यावतीने होत आहे. या कार्याची व्याप्ती आणखी वाढून त्याचा जास्तीत जास्त गरजूंना लाभ व्हावा. फेडरेशन करत असलेल्या या मानवसेवेच्या कार्यात आमचाही खारीचा वाटा आहे यापुढेही आमचे नेहमीच सहकार्य राहील, असे सांगितले.

मोहक बोथरा म्हणाले की, नगरकरांचे भाग्य आहे की, कमी खर्चात गोर-गरीबांना हॉस्पिटल सातत्याने शिबीराच्या माध्यमातून सेवा देत आहे. मोफत शिबीरांच्या माध्यमातून सेवा देण्याचे पुण्य काम आम्हाला मिळाले आहे. सातत्याने सेवा देणे आज शक्य नाही. प्रत्येक गोष्ट महाग होत आहे. त्यामुळे गरीबांना उपचार घेणे अवघड जात आहे. परंतु अशा मोफत शिबीराच्या माध्यमातून आनंदऋषीजी हॉस्पिटलने सातत्याने हे महान कार्य सुरु ठेवले आहे, याचा आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### संत बुवाजी बुवा महाराज पायी दिंडी

अहिल्यानगर- प्रति पंढरपूर समजल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र अरणगांव ते श्रीक्षेत्र पंढरपूर या श्री संत



बुवाजी बुवा महाराज पायी दिंडी सोहळाचे प्रस्थान अरणगाव (मेहेराबाद)येथून दि २० मार्च रोजी होणार असून ,पालखी सोहळा दि २९ मार्च ला चैत्र एकादशीला पंढरपूरला पोहचणार आहे तर ३० मार्चला परत येणार आहे ,श्री संत बुवाजी बुवा महाराज समाधी देवस्थान व समस्त ग्रामस्थ अरणगाव, ता.नगर यांच्या वतीने गेल्या २२ वर्षांपासून हा सोहळा आयोजित केला जात आषाडी एकादशीला अरणगावला उत्सव असतो व दुसऱ्या दिवशी पांडुरंग येथे द्वादशीला उपवास सोडायला येतात अशी आख्यायिका आहे.त्यामुळे येथील भाविक पंढरपूर आषाडी वारी करत नाही व कोणी पंढरपूरला जात नाही,पण वारी चुकली नाही पाहिजे म्हणूंन गेली २१ वर्ष हि पायी दिंडी चैत्र महिन्यात कडक उन्हाळ्यात निघते,त्यामध्ये सुमारे ४०० च्या वर वारकरी सहभागी होतात श्री संत बुवाजी बुवा महाराज पायी पालखी सोहळा श्रीक्षेत्र अरणगांव ते श्रीक्षेत्र पंढरपूर हा १० दिवसाचा असून सद्गुरू बुवाजी बुवा महाराजांच्या कृपाशिर्वादाने व हनुमंत महाराज लोटके,दादाभाऊ महाराज लोटके यांच्या प्रेरणेने अरणगांव येथील बुवाजी बुवा मंदिर येथून दिंडी सोहळाचे प्रस्थान २० मार्चला सकाळी ८ वा होणार आहे,दिंडीत ध्वजकारी,भजनी मंडळ व डोकयावर तुळशी वृदावन घेऊन महिला सहभागी होतात.सध्याचे दिवस कडक उन्हाचे असल्याने पहाटे ४ ते सकाळी ९ व दुपारी ४ ते ७ पर्यंत वारकरी पायी चालतात. देणगीदारांची वतीने वारकऱ्यांची चहा,नाष्टा,रात्रीचे जेवण दुपारचे जेवण व मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली होती,दररोज रात्री कीर्तन होणार आहे, वाळकी,रुईछत्तीशीला चापडगाव,टेंबुर्णी मार्गे दि २९ ला भैरवनाथ देवस्थान ट्रस्ट आश्रम, बार्शीरोड, श्रीक्षेत्र पंढरपूर येथे अध्यक्ष भानुदास कोतकर याच्या सौजन्याने दिंडीचा मुक्काम असून दि ३० मार्च ला काल्याचा महाप्रसाद व द्वादशीचा उपवास सोडून रात्री तेथून दिंडी अरणगाव कडे परत येणार आहे. दिंडीचे नियोजन श्री संत बुवाजी बुवा देवस्थान, समस्त ग्रामस्थ,अरणगांव व पंचक्रोशी यांच्यासह देवस्थानचे विश्वस्त नवनाथ दशरथ गहिले,नानासाहेब यदु करांडे,सुजित बाबुराव कोके,राजु गोरख कोतकर,रामदास गंगाधर शिंदे,सागर रमेश आजबे, रावसाहेब डव्हारे, बाळुमामा शिंदे, अशोक लक्ष्मण जाधव,गोरख भगवंत शिंदे,अमोल लक्ष्मण आमले यांनी केले तरी ज्या भाविकांना सहभागी व्हायचे त्यांनी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### पर्यावरण संरक्षण व विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणासाठी राज्य सरकारने कठोर भूमिका घ्यावी

अहिल्यानगर- राज्यातील पर्यावरण संरक्षण आणि सर्व विद्यार्थ्यांना शिक्षण व उच्चशिक्षण कायमस्वरूपी मोफत उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी गेल्या अनेक वर्षांपासून पाठपुरावा करणारे पर्यावरण कार्यकर्ते गोरक्षनाथ विश्वनाथ गवते (जय मल्हार) यांनी प्रशासन, राज्य सरकार आणि केंद्र सरकारवर दुर्लक्ष केल्याचा आरोप केला आहे. या संदर्भात त्यांनी आजपर्यंत १६ वेळा पत्रव्यवहार करूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचे सांगत शासनाने तातडीने दखल घ्यावी, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

गवते यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, पर्यावरण संरक्षणासाठी शासनाने अनेक नियम आणि कायदे केले असले तरी ते प्रत्यक्षात फक्त कागदावरच दिसून येतात. देशभरात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असून लाखो प्राणी-पक्ष्यांची बेकायदेशीर शिकार आणि हत्या सुरू आहे. यामुळे जैवविविधतेवर गंभीर परिणाम होत असून अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.याशिवाय शेतीत रासायनिक खते व विषारी औषधांचा वाढता वापर, औद्योगिक प्रदूषण, नदी-नाल्यांमध्ये सोडले जाणारे केमिकलयुक्त पाणी आणि हवेतील वाढते प्रदूषण यामुळे माती, पाणी व हवा दूषित होत असल्याचा गंभीर मुद्दा त्यांनी उपस्थित केला आहे. यामुळे जमिनीचा पोत खराब होत असून शेती नापीक होत आहे, तर पिण्यायोग्य पाणी व स्वच्छ हवा मिळणेही कठीण झाले आहे, असे त्यांनी नमूद केले.

# जीवनाची घडी उत्तम ठेवण्यास शरीर फीट ठेवणे आवश्यक – आदिनाथ कोठारे

## साईदीपसहयाद्री वॉकेथोनला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शरीर फीट असले की जीवनाची घडी व्यवस्थित राहते आणि त्यासाठी आवश्यक आहे ते म्हणजे नियमित व्यायाम, शांत मन आणि चेहऱ्यावर स्मित हास्य असे प्रतिपादन फिल्म अभिनेते आदिनाथ कोठारे यांनी केले. साईदीपसहयाद्री वॉकेथोन च्या फ्लॅग ऑफ प्रसंगी बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महापौर सौ ज्योती गाडे उपस्थित होत्या.

साईदीपसहयाद्री हॉस्पिटल च्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रविवारी १५ मार्च रोजी नगर क्लब शेजारील मैदानात शक्ती द पॉवरवॉकेथॉन चे आयोजन करण्यात आले होते यावेळी , डॉ दीपक एस एस, डॉ रवींद्र सोमाणी, डॉ कैलास झालानी, सौ ज्योती दीपक,डॉ किरण दीपक, डॉ वैशाली किरण, डॉ भूषण खर्चे, डॉ अश्विन झालानी,डॉ कस्तुरी कुऱ्हाडे, कु.ध्रिती किरण, मोहन मानधना व इतर मान्यवर मंचावर उपस्थित होते



प्रमुख पाहुणे म्हणून आदिनाथ कोठारे बोलत होते त्यांनी माणसाचे शरीर हीच खरी संपत्ती आहे आणि शरीर फीट असले की जीवनाची घडी व्यवस्थित चालू शकते उपस्थित्यांची संख्या पाहता अहिल्यानगरकर खूप जागरूक आहेत असे मला पाहून खूप आनंद झाला असे ते म्हणाले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना साईदीपसह्याद्री हॉस्पिटल चे चेअरमन डॉ दीपक एस एस यांनी शरीर निरोगी असले की आपोआपच मन प्रफुलीत राहते कोविड काळात असे अनेक रुग्ण दगावले ज्यांची मोठ्या प्रमाणावर असलेली संपत्ती सुद्धा त्यांना वाचवू शकली नाही म्हणून शरीर निरोगी ठेवण्यास नियमित सकस आहार आणि नियमित व्यायाम आवश्यक आहे.

महापौर सौ ज्योती गाडे यांची महिलांसाठी सगळी कडे जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित होतात पण हा आगळा वेगळा कार्यक्रम पाहून मन बाहरले आहे इतक्या मोठ्या संख्येने महिला, पुरुष आणि चिमुकले यांनी या वॉकेथॉन मध्ये भाग घेतला डॉ दीपक सर यांचे नेहमी सर्वाना मार्गदर्शन असते आणि म्हणून खूप सुंदर अशा कार्क्रमास मला उपस्थित राहता आले याबद्दल मी आयोजकांचे आभार मानते असे त्या म्हणाल्या, या वॉथॉन मध्ये नगर मधील विविध महिला संघटना, अरमार्ड कोर ग्रुप, प्रयास ग्रुप व अन्य संघटनानी मोठ्या संख्येने भाग घेतला कार्यक्रमाचे सूत्र संचालन आर जे प्रसन्न यांनी केले व हॉस्पिटल व्यवस्थापक डॉ व्यंकटेश मुळे यांनी आभार मानले.

# पाल्य आणि पालक यांच्यातील सुसंवाद व्यवस्थित ठेवा – पोलीस निरीक्षक प्रियंका आठरे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दिवसेंदिवस लहान मुलांवरील अत्याचार घटना वाढत आहेत. मुलांसोबत काय घडते ते मुलं पालकांना सांगण्याचा प्रयत्न करत असतात. कधी कधी ते वेगवेगळ्या पद्धतीने व्यक्त होतात. आपले मूल नक्की काय सांगत आहे हे समजून घ्या. त्यासाठी पाल्य आणि पालक यांच्यातील सुसंवाद योग्य असला पाहिजे. असे प्रतिपादन महिला सुरक्षा विभागाच्या प्रमुख पोलीस निरीक्षक प्रियंका आठरे यांनी केले.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीची बाई इचरज बाई फिरोदिया प्रशाला येथे वार्षिक क्रीडा मेळावा पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सल्लागार मंडळाचे सदस्य भूषण भंडारी होते. यावेळी मुख्याध्यापिका ज्योती सिसोदिया यांच्यासह सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रियंका आठरे म्हणाल्या की पालकांनी मुलांमधील वाचन सवय वाढवली पाहिजे. डिजीटल आणि तंत्रज्ञानाच्या युगात वाचन संस्कृती कमी होत चालली आहे. पण ज्यांचे वाचन जास्त अशी लोक आत्मविश्वास, भाषा कौशल्य आणि ज्ञानाने परिपूर्ण असतात त्यामुळे सहजपणे त्यांचे वेगळेपण लक्षात येते. आजच्या धावपळीच्या युगात एकत्रित कुटुंब पद्धती कमी झाली आहे. दोघे पालक कुटुंबासाठी नोकरी निमित्ताने बाहेर पडतात. त्यामुळे मुलांना सांभाळण्याचा मोठा प्रश्न त्यांच्यासमोर असतो. यामधूनच समाजात मुलांवर मुलींवर अत्याचाराच्या घटना घडत असतात. अत्याचार करणारे बऱ्याचदा मुलांच्या जवळचे ,ओळखीचे असतात. मुल ते पालकांना अगोदर सांगण्याचा प्रयत्न सुध्दा करतात पण पालक त्याकडे लक्ष देत नाहीत किंवा ते नक्की काय सांगण्याचा प्रयत्न करत आहेत तेच समजत नाही. त्यासाठी पालक आणि पाल्य यांच्यातील सुसंवाद चांगला असला पाहिजे. पाल्याची भावना, भाषा समजून घेतली पाहिजे असेही त्या यावेळी म्हणाल्या.

यावेळी बोलताना भूषण भंडारी म्हणाले की, प्रशाला शहराच्या मध्यभागी असल्याने मैदान नाही. तरीही मुख्याध्यापिका आणि त्यांचे शिक्षक त्याची कमतरता जाणवू देत नाहीत. वेगवेगळ्या पद्धतीने ते विद्यार्थ्यांचे खेळ घेतात, सराव घेतात. संस्थेच्या रूपीबाई बोरा प्रशालेच्या मैदानावर स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना मैदानाचा प्रत्यक्ष अनुभव त्यांनी दिला आहे.शाळेचे हे नियोजन कौतुकास्पद आहे.तसेच त्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी क्रीडा स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि मेडल देऊन गौरविण्यात आले. यावर्षीचा जनरल चॅम्पियनशिप करंडक १ली अ – १ च्या वर्गाला मिळाला. चॅम्पियनशिप मिळालेल्या संघातील विद्यार्थ्यांना दि. ०८/०३/२०२६ रोजी झालेल्या क्रीडा मेळाव्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले प्रमोदजी डागा यांच्यातर्फे उत्स्फूर्तपणे देण्यात आलेल्या ५०१/- रुपये रकमेतून बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन कांतीलाल खुरंगे आणि कांचन नेहुल यांनी केले. यादी वाचन पराग विलायते यांनी तर आभार विशाल तांदळे यांनी मानले.

## केडगावमध्ये सिनेअभिनेत्री श्रुती मराठे यांच्या उपस्थितीत महिला दिन होणार साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** केडगाव येथील श्री छत्रपती फाउंडेशन आणि श्री गणेश व दत्त देवस्थान ट्रस्ट, अंबिका नगर यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी नूतन वर्ष आणि जागतिक महिला दिन निमित्त परिसरातील महिलांचा गुणगौरव सोहळा पार पाडणार आहे.

वॉर्ड नंबर १६ मधील नगरसेविका सौ. वर्षा सुजित काकडे दुसर्या नगरसेविका सौ.सुनीता महेंद्र कांबळे तसेच सौ.अश्विनी अमोल येवले आणि सौ. पूजा विजय पठारे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा रविवार दिनांक २२ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ठीक सहा वाजता चेडे हॉस्पिटल चौक, अंबिका नगर या ठिकाणी संपन्न होणार आहे. दरवर्षीच श्री गणेश व दत्त देवस्थान तर्फे महिला दिन मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. यावर्षी अभिनेत्री श्रुती मराठे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि अहिल्यानगरच्या महापौर सौ. ज्योतीताई गाडे तसेच माजी महापौर सौ. शितलताई जगताप आणि सौ.धनश्री विखे यांच्या उपस्थितीत केडगाव परिसरातील कर्तुत्ववान महिलांचा सन्मान करण्याचे योजिले आहे. तसेच सिने अभिनेत्री श्रुती मराठे यांची प्रकट मुलाखत देखील होणार आहे.

तरी परिसरातील सर्व महिलांनी या कार्यक्रमात उपस्थित राहावे असे आवाहन नगरसेविका सौ .वर्षा काकडे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सौ.शारदा शेजुळ, सौ.निशा बोरगे, सौ.वसुधा देशपांडे, सौ.प्रतिमा कुलकर्णी, सौ.योगिता पवार, सौ.चारू आचारी आणि अंबिका नारी संघाच्या सर्व सदस्य परिश्रम घेत आहे.

## भोंदू कॅप्टन अशोक खरात याच्या सर्व गैरकृत्यांची सखोल चौकशी करा : महाराष्ट्र अंनिसचे पोलीस आयुक्तांना निवेदन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्वतःला कॅप्टन म्हणवून घेणारा आणि राजकीय ज्योतिषी म्हणवून मिरवणारा अशोक खरात याला नाशिक क्राईम ब्रँच युनिट एक यांनी बलात्कारासारख्या अतिशय गंभीर गुन्ह्यात अटक केली. खरंतर, मागील तब्बल २५वर्षांहून अधिक काळापासून या भोंदूने नाशिक शहर तसेच इतरत्र बड्या बड्या लोकांना भविष्य वर्तवण्याचा बहाणा करून, त्यांचे मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या प्रकारे शोषण केले असल्याची महाराष्ट्र अंनिसला दाट शंका होती. म्हणून त्याच्या आजपर्यंतच्या सर्व गैर कृत्यांची सखोल चौकशी करून सबळ पुरावे मिळवावेत आणि त्याच्यासह त्याच्याशी संबंधित सर्वांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशा आशयाचे निवेदन महाराष्ट्र अंनिसच्या वतीने नाशिक शहर पोलीस आयुक्त यांना सादर करण्यात आलेले आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की. मोठ-मोठे प्रतिष्ठित लोक तसेच बडे राजकीय नेते मंडळी ह्या भोंदूच्या पाठीमागे असल्याने त्यांचे ,त्याला पाठबळ आणि प्रोत्साहन मिळत असावे. त्यामुळे त्याने नाशिक सह, सिन्नर तालुक्यातील एका गावात मोठ्या प्रमाणात हा ज्योतिष सांगण्याचा आणि विविध धार्मिक कर्मकांड करण्याच्या नावाखाली लोकांचे, विशेषतः महिलांचे शोषण करण्याचा उद्योग वाढवला.

नोव्हेंबर, २०२२ मध्ये महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, त्यांच्या काही सहकाऱ्यांसह ज्योतिष जाणून घेण्यासाठी सदर भोंदूकडे गेले असल्याचे समजले होते. त्यावेळी महाराष्ट्र अंनिसने ही बाब उघड केली होती आणि निषेध नोंदवला होता. तरीही या भोंदूवर त्यावेळी काहीही कायदेशीर कारवाई झाली नाही. कॅप्टन अशोक खरात यांनी जो ट्रस्ट स्थापन केला आहे त्यामध्ये काही राजकीय व्यक्तींचा समावेश असल्याचे महाराष्ट्र म्हणणे आहे. ह्या भोंदूकडे ५८रहस्यमय व्हिडिओ सापडल्याचेही समजते. त्यामध्ये अनेक बड्या बड्या हस्ती तसेच राजकीय नेत्यांचाही संबंध असण्याची दाट शंका आहे. त्यामुळे साहजिकच पोलिस तपासयंत्रणेवर राजकीय दबाव येण्याचाही दाट शंका अंनिसने व्यक्त केली आहे. म्हणून आपण अतिशय सावधगिरीने या भोंदूच्या विरोधातले सर्व सबळ पुरावे मिळवावेत आणि त्याच्यासह ह्या अंधश्रद्धेच्या माध्यमातून झालेल्या शोषणाला कारणीभूत ठरणाऱ्या सर्वांवर कडक कायदेशीर कारवाई करावी, असे निवेदनात म्हटले आहे.

असे घडल्यास आज मितीला जोरात सुरू असलेल्या ज्योतिषांच्या भंपकबाजीला आणि त्या माध्यमातून होणाऱ्या शोषणाला मोठ्या प्रमाणात आळा बसण्यास मदत होईल . तसेच लोकांमध्येही ज्योतिषाचा फोलपणा लक्षात येईल , अशी अपेक्षा अंनिसने व्यक्त केलेली आहे.

## ग्रामीण भागातून यशाची परंपरा जपणारी टॉपर्स अकॅडेमी, काष्टी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर प्रवेश प्रक्रिया सुरू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**श्रीगोंदा–** मागील चार वर्षांपूर्वी ग्रामीण भागात, म्हणजेच काष्टी येथे सुरू झालेल्या टॉपर्स अकॅडेमीने अल्पावधीतच उल्लेखनीय यश संपादन करत महाराष्ट्रातील नामवंत अकॅडेमीच्या बरोबरीने निकाल देण्याची किमया साधली आहे. पहिल्याच तीन वर्षांच्या निकालांमधून अकॅडेमीने आपली गुणवत्ता सिद्ध केली असून, विद्यार्थ्यांनी भारतातील अग्रगण्य, व संस्थांमध्ये तसेच महाराष्ट्रातील नामांकित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये करिता प्रवेश मिळवला आहे.

अगदी कमी कालावधीत टॉपर्स अकॅडेमीने दिलेल्या उल्लेखनीय निकालामुळे विद्यार्थ्यांनी यशाची नवी उंची गाठली आहे. या सातत्यपूर्ण यशामुळे पालकांचा विश्वासही मोठ्या प्रमाणात संपादन करण्यात अकॅडेमी यशस्वी ठरली आहे. त्यामुळे पुणे, अहिल्यानगर तसेच सोलापूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी टॉपर्स अकॅडेमी ही पहिली पसंतीची अकॅडेमी ठरताना दिसत आहे.

याच यशस्वी परंपरेला पुढे नेत, गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर टॉपर्स अकॅडेमी, काष्टी येथे इयत्ता अकरावी-बारावी साठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे. - व साठी दोन वर्षांचा सखोल अभ्यासक्रम राबविण्यात येत असून, अकरावीतून बारावीत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक वर्षाचा विशेष बॅचही उपलब्ध आहे.

तसेच इयत्ता सातवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी वीकेंड फाउंडेशन कोर्सेस सुरू असून, लहान वयातच स्पर्धा परीक्षांची भक्कम पायाभरणी करण्यावर भर दिला जात आहे.

यावर्षी 'टार्गेट बॅच' ही विशेष संकल्पना सुरू करण्यात आली आहे. या बॅचमध्ये दहावीतील विद्यार्थी लवकरच , व - परीक्षांची तयारी सुरू करून, पुढील रिपीटची गरज भासू नये यासाठी नियोजनबद्ध मार्गदर्शन दिले जाणार आहे. तसेच येत्या रविवारी, दि. २२ मार्च रोजी फाउंडेशन व टार्गेट बॅचसाठी स्कॉलरशिप परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व इच्छुक विद्यार्थ्यांनी व पालकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन टॉपर्स अकॅडेमीचे संचालक प्रा. गणेश कळसकर सर (९६५७५७५२५२) यांनी केले आहे.

# नवनाथ देवस्थान सेवा मंडळा विरुध्द बबन गणपत ढवळे यांच्या तक्रारीची चौकशी व्हावी - विश्वस्त गणेश विद्ये

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बबन गणपत ढवळे यांनी नवनाथ देवस्थान सेवा मंडळ विरुद्ध जिल्हा पोलीस अधीक्षक व पाथर्डी पोलीस स्टेशनला तक्रार अर्ज दिलेले असून या तक्रारमध्ये उल्लेख केलेली संस्था नवनाथ देवस्थान सेवा मंडळ ट्रस्ट, बोल्हेगाव, अ.नगर एफ-१७० ही संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा १९५० च्या तरतुदी अन्वये स्थापन झालेली असून सदरच्या संस्थेची स्थापना सन १९७२ साली कै. विजयकुमार सखाराम सुळे व कै. गंगाराम नरसय्या विद्ये यांनी स्थापन केलेली असून नाथांचा प्रचार व प्रसार करून अध्यात्मिक कार्य करणे असा उद्देश होता व आहे. प. पु. महाराज यांचा गणेश विद्ये हे निस्सीम भक्त असून या संस्थेचा हितचिंतक व विश्वस्त आहे.

बोल्हेगाव,अहिल्यानगर येथे सदर संस्थेचे मुख्य कार्यालय असून या संस्थे मार्फत राघवेंद्र स्वामी मंदिर, देवेंद्रनाथ महाराज मंदिर, प्राथमिक शाळा, माध्यमिक विदयालय, मंगल कार्यालय याचे कामकाज पाहिले जाते. तसेच मढी, ता. पाथर्डी या ठिकाणी प. पू. देवेंद्रनाथ महाराज समाधी मंदिर आहे व त्या ठिकाणी संस्थेचे कार्यालय व भक्त निवास आहे. संस्थे मार्फत वर्षभर धार्मिक कार्यक्रम सुरू असतात. पुणे, मुंबई, नाशिक व महाराष्ट्रातील भाविक भक्तगण मोठ्या संख्येने मढीमध्ये येत असतात. मढीमध्ये येणा-या भाविक भक्तांची राहण्याची, भोजनाची व इतर सर्व व्यवस्था करण्याच्या कामासाठी संस्थेने श्री मच्छिंद्र ने हे यांची नेमणुक केलेली आहे. गेल्या २०-२५ वर्षा पासुन ते आश्रमामध्येच राहून अत्यंत कमी पगारावर प्रामाणिकपणे काम करतात.

गेल्या अनेक वर्षांपासून संस्थेत काम करीत असल्यामुळे सर्व भाविक भक्तांचा व विश्वस्तांचा त्यांच्यावर विश्वास निर्माण झालेला आहे. गेल्या दोन-तीन वर्षापुर्वी मढी चे आश्रमात संस्थेचे कर्मचारी श्री मच्छिंद्र ने-हे यांच्याकडे प. पु. महाराज यांच्या एका भाविक भक्ताने नाव गुपित ठेवण्याच्या अटी वर रु. ३००००००/- अक्षरी तीस लाख ची रोख स्वरूपात देणगी दिल्याचे व सदरची देणगी रक्कम श्री मच्छिंद्र ने हे यांनी संस्थेच्या बँक खात्यामध्ये भरणा करण्यात आल्याचे सांगितले, त्याच वेळी मछिंद्र ने हे यांनी त्यांच्या भावाने त्यांच्या साठी एक चारचाकी गाडी टाटा पंच ही नवीन गाडी दिल्याचे सांगीतले.



हे गेले अनेक वर्षापासुन मच्छिंद्र ने हे यांचा मुक्काम मढीच्या आश्रमात असल्यामुळे व संस्थेचे काम अत्यंत प्रामाणिक पणे करीत असल्यामुळे अनेक भाविक भक्तांचा विश्वास त्यांनी संपादीत केलेला आहे.

तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीमध्ये मच्छिंद्र ने हे व इतरांनी मुंबई येथील अधिकारी व नाथ भक्त श्री अमित शिंदे यांचे नाव सांगुन व झोन उठवुन देतो असे सांगुन जानेवारी २०२३ ला रु. २०,००,०००/- अक्षरी वीस लाख , एप्रिल २०२३ ला रु.५०,००,०००/-अक्षरी पन्नास लाख व जुलै २०२३ ला रु.३०,००,०००/- अक्षरी तीस लाख असे एकुण रक्कम रुपये १,००,००,०००/- अक्षरी एक कोटी त्यांचेकडे दिले होते व मौजे टेभुर्नी, ता. खामगाव, जि. बुलढाणा येथील गट नं. ६६२ क्षेत्र १२ एकर जमीनीवर असलेले सरकारी आरक्षण (झोन) उठवुन देतो म्हणुन सदरची रक्कम घेतलेली होती असे नमुद केलेले आहे.

अशा प्रकारे नवनाथ देवस्थान सेवा मंडळ ट्रस्टच्या विश्वासु कर्मचारी मच्छिंद्र ने-हे व दिगंबर मरकड यांचे विरुध्द गंभीर तक्रारींचा अर्ज दाखल झालेला असल्यामुळे व सदरचा अर्ज भाविक भक्तांच्या व्हॉटसऐप ग्रुपवर प्रसारीत झालेला असल्यामुळे राघवेंद्र स्वामी व देवेंद्रनाथ महाराज यांना मानणा-या नाथ भक्तांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झालेली असून भाविक भक्ता मध्ये उलट सुलट चर्चा होत असल्यामुळे सदर तक्रार अर्जाची गांभीर्याने दखल घेवुन कारवाई होणे आवश्यक आहे.

वास्तविक पाहता दिगंबर मरकड हे गुरुबंधू असून त्यांचे वडिल साहेबराव व आजोबा सुखदेव मरकड या कुटूंबियांच्या सहकार्यामुळे सदर संस्थेला मढी येथे मोठे धार्मिक कार्य करण्याची संधी प्राप्त झालेली आहे. श्री मच्छिंद्र ने हे व दिगंबर मरकड हे अत्यंत प्रामाणिकपणे व निष्ठने त्यांनी आजपर्यंतचे सेवाकार्य करीत असताना तक्रारदार श्री ढवळे यांनी कर्मचारी मच्छिंद्र ने हे, दिगंबर मरकड व संस्थचे अध्यक्ष श्रीमती राजश्रीताई सुळे यांचे विरुध्द जे आरोप केलेले आहेत ते अत्यंत गंभीर स्वरुपाचे व प्रतिमा मलीन करणारे आहे. त्या मुळे गुरुबंधूचे, संस्थेचे व प. पु. महाराजांचे कार्याची मोठ्या प्रमाणात बदनामी होत आहे. या कृत्यामुळे भाविकांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी व चिड निर्माण होत असुन अनेक भाविकांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष भेटून याबाबत कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केलेली असल्यामुळे सदर संस्थेचे विश्वस्त श्री. गणेश विद्ये यांनी अहिल्यानगर चे जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या कडे अर्ज देऊन बबन ढवळे यांनी दिलेल्या तक्रारीमधील केलेले आरोप अत्यंत गंभीर स्वरुपाचे व मोठ्या आर्थिक अपहाराचे असून या तक्रारीची सखोल व निरपेक्षपणे चौकशी करुन दोषींवर तात्काळ गुन्हा दाखल करुन संस्थेची, नाथ परिवाराची व पं. पू. महाराजांची बदनामी थांबवावी असे निवेदन दिले असून त्याची प्रत पोलीस महानिरीक्षक साहेब नाशिक परीक्षेत्र, नाशिक यांनाही पाठविले आहे. तसेच वरील प्रकरणा बाबत गुरुबंधूना काही सूचना, शंका असतील त्यांनी व्हाटस्ॲप किंवा इतर ठिकाणी चर्चा न करता संस्थेला अथवा विश्वस्त मंडळ यांना कळवावे असे आवाहन विश्वस्त श्री गणेश विद्ये यांनी एका पत्रकान्वये केले आहे.

तळागाळातील गोरगरिबांच्या महिलांचे

# जीवनमान उंचावणे हेच खरे महिला दिनाचे उद्दिष्ट- महापौर ज्योती गाडे



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** केंद्र व राज्य शासनाने महिलांसाठी अनेक कल्याणकारी योजना जाहीर केल्या असून त्याचा प्रत्यक्ष लाभ तळागाळातील, आर्थिकदृष्ट्या कमकुवत व गोरगरिब महिलांपर्यंत पोहोचवणे यातच खऱ्या अर्थाने महिला दिन साजरा होतो, असे प्रतिपादन अहिल्यानगर महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित महापौर ज्योतिताई गाडे यांनी केले. भारतीय जनता पार्टी ओबीसी महिला मोर्चाच्या शहर जिल्हाध्यक्ष स्वाती सिरसुल व नगरसेविका मयुरी जाधव यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून त्या बोलत होत्या. यावेळी त्यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती शितलताई संग्राम जगताप यांची होती.

या कार्यक्रमात शहरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा तसेच नवनिर्वाचित महिला नगरसेविकांचा सन्मान करण्यात आला. या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करताना शितल जगताप यांनी सांगितले की, महिलांच्या कार्याचा गौरव करणारे असे कार्यक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरतात. यामुळे इतर महिलांनाही विविध क्षेत्रांत कार्य करण्याची प्रेरणा मिळते. त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल स्वाती सिरसुल व मयुरी जाधव यांचे अभिनंदन केले.

भाजप महिला जिल्हाध्यक्ष प्रिया जानवे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून महिलांचे संघटन अधिक बळकट होते आणि त्यांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी सक्षम व्यासपीठ निर्माण होते. अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा असून त्या पूर्ण करण्यासाठी राज्याचे लाडके मुख्यमंत्री फडणवीस साहेबांनी विविध योजना राबवल्या आहेत. मात्र या योजना प्रत्यक्षात सामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी महिलांनी सामूहिकरित्या उचलावी, असा निर्धार श्वेता झोंड, कालिंदी केसकर, सुजाता औटी, संध्या पावसे, रेणुका करंदीकर, स्वाती पवळे, ज्योती दांडगे, रेखा मैड, जोशना मुंगी, अर्चना बनकर, राखी आहेर, पल्लवी जाधव, पद्मा बोरुडे, मीरा सरोदे, कावेरी घोरपडे, उज्वला भांगे, सुरेखाताई जंगम, लीला अग्रवाल आदी महिला कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महापौर ज्योतिताई गाडे यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या विचारांचा व शौर्याचा आदर्श महिलांनी अंगीकारावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. ‘‘सन्मान अहिल्याच्या लेकींचा’’ या उपक्रमांतर्गत विविध क्षेत्रांतील मान्यवर महिलांचा गौरव करण्यात आला. यामध्ये फॅशन डिझायनर वैष्णवी रोकडे, चार्टर्ड अकाउंटंट सुनंदा रच्चा, गायिका इलाक्षी पाथरे, ॲड. सुजाता बोडके, प्रतीक्षा मंगलारम, ॲड. वंदना पालवे, डॉक्टर भावना व भाग्यश्री पेंडम, ब्युटीशियन व हेअर स्टायलिस्ट सौ. सुनीता पुंड व सौ. अनुजा कांबळे, उद्योजिका पूजा राठोड, फॅशन डिझायनर पूजा बेद्रे, पत्रकार स्नेहा जोशी, संगीत विशारद दीप्ती द्यावंनपल्ली, न्यूज चॅनेल संपादिका श्रुती बत्तीन, एपीआय मुंबई अमृता जाधव आदी कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला.

तसेच भाजपाच्या नूतन महिला नगरसेविका शारदा ढवन, रोशनी त्रिंबके, सोनाबाई शिंदे, सुनीता कुलकर्णी, वर्षा सानप, आशाबाई कातोरे, शितलताई ढोणे, हरप्रीत कौर गंभीर यांचाही शाल, स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमात जिल्हाध्यक्ष प्रिया जानवे, कालिंदी केसकर, नगरसेविका शितल ढोणे, महिला व बालकल्याण उपसभापती वर्षा सानप, स्नेहा जोशी, प्रणाली कडूस, शामला बोरा आदी मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले.

# महिलांनी योगाद्वारे आरोग्य सदृढ ठेऊन आत्मविश्वास वाढवावा - पल्लवी विजयवंशी

## आनंद योग केंद्रात योग–प्राणायामातून महिलांनी केला निरोगी जीवनाचा संकल्प

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** सावेडी येथील आनंद योग केंद्रात आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी महिलांनी योग, प्राणायाम व विविध शारीरिक प्रात्यक्षिकांद्वारे आरोग्याचा जागर करत निरोगी जीवन जगण्याचा संकल्प केला. कार्यक्रमात महिलांचा मोठा सहभाग होता.

या कार्यक्रमास भिंगार कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी आपल्या मनोगतात योग, प्राणायाम आणि नियमित व्यायामाचे महत्त्व अधोरेखित केले. ‘‘दररोजचा योगाभ्यास केल्याने शरीर तंदुरुस्त राहते, मानसिक ताण कमी होतो आणि मन सकारात्मक दिशेने विचार करू लागते,’’ असे त्यांनी सांगितले. तसेच, महिलांनी स्वतःच्या आरोग्याला प्राधान्य देणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. निरोगी शरीरातूनच आत्मविश्वास निर्माण होतो आणि त्यातूनच जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची ताकद मिळते, असे त्यांनी स्पष्ट केले.

स्वतःच्या जीवनप्रवासाविषयी बोलताना विजयवंशी यांनी आपल्या यशाचे श्रेय आईला दिले. ‘‘लहान मुलांना योग्य मार्गदर्शन, सकारात्मक पाठबळ आणि आत्मविश्वास दिल्यास ते कोणतेही ध्येय गाठू शकतात,’’ असे त्यांनी सांगितले. सातत्य, चिकाटी आणि मेहनत यामुळेच यश मिळते, हा संदेश त्यांनी उपस्थित महिलांना दिला.

शिक्षणाबरोबरच खेळ, स्पर्धा आणि सर्जनशील छंद यांचा समतोल राखणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. नवोदय विद्यालयात शिक्षण घेत असताना विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होऊन त्यांनी मिळवलेले अनुभव त्यांनी सांगितले. अभ्यास, खेळ आणि छंद यांचा योग्य समन्वय साधल्यास सर्वांगीण विकास साधता येतो, असे त्यांनी नमूद केले.

स्पर्धा परीक्षांची तयारी करताना आलेल्या अडचणी व अनुभव सांगताना त्यांनी ‘‘अडचणी आल्या तरी खचून न जाता सातत्याने प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. विशेषतः महिलांनी नियमितता आणि आत्मविश्वास ठेवला, तर त्या कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होऊ शकतात,’’ असा प्रेरणादायी संदेश दिला.


कार्यक्रमात महिलांनी योगा डान्स, प्राणायामाची प्रात्यक्षिके सादर करत उपस्थितांची दाद मिळवली. यामुळे आरोग्य आणि फिटनेसबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अलका कटारिया यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रेखा हाडोळे, पूजा ठमके, उषा पवार, सोनाली जाधवर, संगीता जाधव, स्मिता उदास व राजुल कटारिया यांनी विशेष परिश्रम घेतले.

# वेतनेतर अनुदान बंद धोरणामुळे अनुदानित शाळा आर्थिक संकटात – बाबासाहेब बोडखे

## । वेतनेतर अनुदान धोरणाचा पुनर्विचार करा; शिक्षक–कर्मचाऱ्यांची आर्थिक लुबाडणूक थांबवा
## । शिक्षक परिषदेची मागणी; तुटपुंज्या अनुदानामुळे शिक्षकांवर आर्थिक ताण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** राज्यातील वेतनेतर अनुदान धोरणाचा तात्काळ पुनर्विचार करून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची आर्थिक लुबाडणुकीतून मुक्तता करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भातील सविस्तर निवेदन शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष तथा माजी शिक्षक आमदार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री पंकज भोयर तसेच शिक्षण सचिव रणजित सिंह देओल यांना पाठविण्यात आले असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.



राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना शासन निर्णय दि. १८ जून १९९३ नुसार शाळेच्या विकास निर्देशांकावर आधारित ६, ९ व १२ टक्यांपर्यंत वेतनेतर अनुदान देण्यात येत होते. मात्र, दि. २४ नोव्हेंबर २००१ च्या शासन निर्णयान्वये हे अनुदान २००४–०५ पासून बंद करण्यात आले. यामुळे अनुदानित शाळांवर मोठे आर्थिक संकट ओढवले असून, शाळा चालविण्याच्या नावाखाली शिक्षक व कर्मचाऱ्यांकडून आर्थिक वसुलीची पद्धत रूढ झाली, असा आरोप शिक्षक परिषदेने केला आहे.

दरम्यान, वेतनेतर अनुदान पुन्हा सुरू करण्यासाठी झालेल्या आंदोलनाची दखल घेत शासनाने दि. १९ जानेवारी २०१३ रोजी निर्णय घेत १ एप्रिल २०१३ पासून तुटपुंजे अनुदान सुरू केले. या निर्णयानुसार १ एप्रिल २००८ रोजी १०० टक्के वेतन अनुदानावर असलेल्या शाळांना ५ टक्के वेतनेतर अनुदान (४ टक्के वेतनेतर व १ टक्का इमारत देखभाल) मंजूर करण्यात आले. मात्र, हे अनुदान ५ व्या वेतन आयोगाच्या स्तरावर गोठवून देण्यात आल्याने ते अत्यंत अपुरे ठरत आहे.

याशिवाय, १ एप्रिल २००८ नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शाळांना या योजनेतून वगळण्यात आल्याने त्या शाळा वेतनेतर अनुदानापासून पूर्णपणे वंचित राहिल्या आहेत. परिणामी, या शाळांतील शिक्षक व कर्मचाऱ्यांवर आर्थिक भार वाढला असून, त्यांच्या वेतनातून दरमहा मोठ्या प्रमाणावर कपात केली जात असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

शिक्षक परिषदेच्या मते, सध्याच्या धोरणामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी भीतीच्या वातावरणात काम करत असून, नोकरी गमावण्याच्या धास्तीमुळे आर्थिक शोषण सहन करत आहेत. या परिस्थितीमुळे शिक्षण क्षेत्रात गंभीर आर्थिक दुरावस्था निर्माण झाली आहे. ही पार्श्वभूमी लक्षात घेता, वेतनेतर अनुदान धोरणाचे तातडीने पुनर्विलोकन करून शाळांना सक्षम आर्थिक आधार द्यावा व शिक्षक–कर्मचाऱ्यांवरील अन्याय दूर करावा, अशी मागणी शिक्षक परिषदेने शासनाकडे केली आहे.

# जनतेच्या आवाजाला प्रतिसाद देणंच लोकप्रतिनिधीच काम – आमदार काशिनाथ दाते सर

## बेल्हा–शिरूर रस्त्याचे काम पुन्हा सुरु

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** बेल्हा–शिरूर या महत्त्वाच्या मार्गाचे काम जवळपास पूर्णत्वास आले असताना काही ठिकाणी आंदोलनामुळे ते अचानक ठप्प झाले होते. विशेषतः निघोज एस.टी. बसस्थानक परिसरात काम बंद पडल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. खराब रस्त्यामुळे गेल्या दोन महिन्यांत शंभरहून अधिक दुचाकी अपघात घडल्याने अनेक कुटुंबांना आर्थिक व मानसिक फटका बसला होता. नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती.

या पार्श्वभूमीवर ‘‘आपली माती आपली माणसं’’ या सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रुपेश ढवण यांनी आमदार काशिनाथ दाते सर यांची भेट घेऊन प्रत्यक्ष परिस्थितीची माहिती दिली. तसेच पारनेर तालुका पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनीही संपर्क कार्यालयात झालेल्या बैठकीत रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी केली. जनतेच्या या भावना लक्षात घेऊन आमदार दाते सरांनी तात्काळ जिल्हाधिकारी व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधत दि. ३१ मार्चपूर्वी काम पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. त्यांच्या या ठोस हस्तक्षेपानंतर बुधवार दि. १८ मार्चपासून रस्त्याचे काम पुन्हा सुरू झाले आहे.

आमदार दाते यांच्या तत्पर निर्णयक्षमतेमुळे आणि जनतेप्रती असलेल्या बांधिलकीमुळे हे काम मार्गी लागल्याने निघोज परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. ‘‘बोलण्यापेक्षा कृतीतून उत्तर देणारे नेतृत्व’’ अशीच प्रतिक्रिया सर्वसामान्यांतून उमटत असून मतदारसंघात सुरू असलेल्या विकासकामांबाबत नागरिकांमध्ये सकारात्मक भावना निर्माण झाली आहे.

या कामाच्या पुर्नप्रारंभाबद्दल पारनेर तालुका पत्रकार संघ, रुपेश ढवण (आपली माती आपली माणसं), निघोज ग्रामस्थ, मुंबईकर मंडळ व कुलाबा मंडळ यांच्या वतीने आमदार काशिनाथ दाते यांचे आभार मानण्यात आले.

चौकट : ‘‘निघोज परिसरातील रस्त्याच्या बिकट अवस्थेमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. ही परिस्थिती आम्ही आमदार काशिनाथ दाते सरांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तात्काळ दखल घेत काम पुन्हा सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला. त्यांच्या या तत्पर निर्णयामुळे जनतेला मोठा दिलासा मिळाला आहे. विकासकामांप्रती असलेली त्यांची बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.’’ रुपेश ढवण (आपली माती आपली माणसं)

चौकट : ‘‘निघोज परिसरातील रस्त्याचे काम बंद पडल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे आमदार दाते सरांच्या निदर्शनास आणून देताच त्यांनी तात्काळ प्रशासनाशी संपर्क साधून काम सुरू करण्याचे आदेश दिले, ही त्यांच्या कार्यतत्परतेची जाणीव करून देणारी बाब आहे.

# राज्य सरकारी कर्मचारी-शिक्षकांचा २१ एप्रिलपासून बेमुदत संपाचा इशारा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** राज्यातील प्रलंबित व जिव्हाळ्याच्या मागण्यांकडे शासनाचे वारंवार दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ, राज्यातील सरकारी कर्मचारी व शिक्षकांनी आता बेमुदत संपाचा इशारा दिला आहे. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, अहिल्यानगर शाखेच्या वतीने मंगळवार, दि. २१ एप्रिल २०२६ पासून राज्यभर बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे.

या संदर्भातील अधिकृत नोटीस निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविण्यात आली आहे. यावेळी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, सरचिटणीस रावसाहेब निमसे, उपाध्यक्ष विलास पेद्राम, भाऊसाहेब डमाळे, विजय काकडे, अशोक मासाळ, संदीपान कासार, भागवत नवगण, श्रीमती व्ही. डी. नेटके, ए. बी. बडधे, वैभव सांगळे, विठ्ठल उरमुडे, शेखर उंडे, सुभाष येवले, अविनाश विधाते, अविनाश साठे, प्रवीण हिकरे आदी उपस्थित होते.

राज्यातील सुमारे १७ लाख कर्मचारी व शिक्षक गेल्या वर्षभरापासून आपल्या मागण्यांसाठी सातत्याने आंदोलन करत आहेत. या कालावधीत त्यांनी विविध लोकशाही मार्गांनी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. ६ मार्च २०२५ : राज्यभर धरणे सत्याग्रह, २० मे २०२५ : दोन तासांचे ‘‘वॉक आऊट’’ आंदोलन, ९ जुलै २०२५ : राज्यव्यापी निदर्शने, ११ नोव्हेंबर २०२५ : भोजनावकाशात निदर्शने, ५ डिसेंबर २०२५ : शाळा बंद आंदोलन, ९ ते ११ डिसेंबर २०२५ : नागपूर येथे हिवाळी अधिवेशनादरम्यान साखळी उपोषण, १२ फेब्रुवारी २०२६ : पुन्हा राज्यभर धरणे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनांनंतर शासनाकडून १५ दिवसांत चर्चा करून निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने कर्मचारी वर्गात तीव्र नाराजी पसरली आहे.

माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात जाहीर करण्यात आलेली ‘‘सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना’’ अद्याप पूर्णतः कार्यान्वित झालेली नाही. या योजनेअंतर्गत आवश्यक नियम व अधिसूचना जारी न झाल्याने १ मार्च २०२४ नंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे पेन्शन प्रलंबित आहे. विशेष म्हणजे, अनेकांना तात्पुरते निवृत्ती वेतनही मिळालेले नाही, ही बाब संतापजनक असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

राज्यातील विविध विभागांतील रिक्त पदे अद्याप भरली गेलेली नाहीत. त्यामुळे विद्यमान कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण वाढला आहे. त्याचबरोबर कंत्राटी कर्मचारी अनेक वर्षे सेवा देत असूनही त्यांचे नियमितीकरण होत नसल्याने त्यांचे आर्थिक शोषण होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. तसेच, अनुकंपा तत्त्वावरील नियुयांमध्ये विलंब, वयोमर्यादेमुळे पात्र उमेदवारांना संधी न मिळणे, सेवा निवृत्ती वय ६० वर्षे करण्याची मागणी, तसेच शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विविध प्रलंबित प्रश्न तातडीने सोडविण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे.

स्वामी समर्थ मंदिरात प्रकट दिनानिमित्त पारायण प्रारंभ

# दु:खाचे निवारण होऊन आध्यात्मिक शांती मिळविण्यासाठी गुरुलीलामृताचे पठण करा – देवरे गुरुजी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आपल्या अंत:करणातून आपण जी भक्ती करतो त्या भक्तीच्या कृपेचा अनुभव श्री गुरुलीलामृत पठणाने स्वामी समर्थ महाराजांचे लिला आणि अगाथ शक्तीचा अनुभव येतो. या ग्रंथपठनाने आत्मज्ञान प्राप्त होते, संसारिक दुःखापासून मुक्ती मिळण्यास मदत होते, पितृदोष, वास्तुदोष यामुळे जातात. भक्तांच्या दुःखाचे निवारण होऊन आध्यात्मिक शांती मिळविण्यासाठी गुरुलीलामृताचे पठण भाविकांनी अवश्य करावे.असे निरूपण निखिल देवरे गुरुजी यांनी केले.

सावेडी उपनगरात गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिरात प्रकट दिनानिमित्त श्री गुरुलीलामृत ग्रंथ पारायणास प्रारंभ झाला.यावेळी व्यासपीठ चालक देवरे गुरुजी यांनी प्रारंभी या ग्रंथपठनाने भाविकांना काय लाभ होतो त्याचे महत्त्व विशद केले.या ग्रंथ पारायणास भाविक मोठ्या संख्येने उपस्थित आहेत.तीन दिवस या ग्रंथाचे पारायण मंदिरात रोज दुपारी साडेबारा ते अडीच पर्यंत सुरू असते. महिला भक्त मोठ्या संख्येने या पारायणास बसलेले आहेत.

नववर्षाच्या गुढी पाडव्यानिमित्त श्री स्वामी समर्थ मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करून स्वामींच्या गाभाऱ्यात फुलांची भव्य सजावट करण्यात आली. सकाळी, दुपारी,रात्री भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी करतात. प्रकट दिनाच्या दिवशी दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी भाविकांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा. असे आवाहन मंदिराच्या वतीने स्वयंसेवकांनी केली आहे.

(पान १ वरून)

## भिंगारमध्ये महात्मा जोतिबा फुले व डॉ. आंबेडकर जयंती मिरवणुकीवर डीजे बंदी

असल्याची खंत मंडळांनी व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर नागरदेवळे व भिंगार येथील महात्मा फुले जयंती उत्सव मंडळांनी जिल्हाधिकारी साहेब व पोलिस प्रशासनाकडे निवेदन सादर करून,कायदेशीर अटी–शर्तींसह वापरास परवानगी देण्याची मागणी केली आहे.तसेच निवडणूक काळात , ट्रॅक्टर, जनरेटर यांसारखी साहित्य जप्त करू नयेत,अशीही मागणी करण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित मंडळ व पदाधिकाऱ्यांवर कारवाई करावी,मात्र परंपरा खंडित करू नये,असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान,या प्रकरणी प्रशासन काय निर्णय घेते याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

या निवेदनावर निखिल शेलार, सुशील कदम,गणेश काटकर, ओम धाडगे,ओमकार जाधव, ऋषी दळवी,यश धाडगे,गणेश पांढरे,राजेश धाडगे,मुकेश झोडगे यांच्या सह्या आहेत.

## पांढरीपुल, इमामपूर घाटात मंगळसूत्र चोरांचा धुमाकूळ

दरम्यान, गेल्या आठवड्यात घडलेल्या एका घटनेने परिसरात खळबळ उडाली. पांढरीपुल येथील हॉटेल व्यावसायिक मिलिंद भवार हे आपल्या पत्नीसह नातेवाईकांच्या कार्यक्रमावरून परतत असताना, इमामपूर घाटात रात्री सुमारे ९.३० वाजता अज्ञात चोरट्यांनी त्यांचा पाठलाग करून लुटमार केली. या घटनेनंतरही आरोपी मोकाट फिरत असल्याने पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

भवार कुटुंबीयांनी दिलेल्या तक्रारीनंतरही अद्याप आरोपींचा शोध लागलेला नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. अशा प्रकारच्या अनेक घटना घडूनही गुन्हेगारांना पकडण्यात अपयश येत असल्याने चोरट्यांचे धाडस वाढले असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

छावा संघटनेने या प्रकरणांचा तपास तात्काळ स्थानिक गुन्हे शाखेकडे (एलसीबी) वर्ग करावा, तसेच अहिल्यानगरमधील सर्व सराफ व्यावसायिकांच्या नोंदवहीची स्वतंत्र तपासणी करून चोरीच्या सोन्याचा मागोवा घ्यावा, अशी मागणी केली आहे.

## ३ हॉटेल्सवर धाड; ५ गॅस सिलिंडर जप्त

बिअर बार अँड परमिट रूम' येथे १ सिलिंडर जप्त करण्यात आला. या प्रकरणी संबंधित चालकांवर जीवनावश्यक वस्तू अधिनियमांतर्गत कारवाई करण्यात आली आहे. कारवाईदरम्यान कर्मचारी विनोद शिरसाठ व राजू शिंदे यांनी सहभाग घेतला. दरम्यान, व्यावसायिकांनी घरगुती गॅसचा वापर करू नये, अन्यथा कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पुरवठा विभागाने दिला आहे.